अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २७ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : २९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## जगज्जेते 'साहेब' स्पर्धेबाहेर; श्रीलंकेचा ८ विकेट्सनी विजय



**बंगळुरु** : विश्वचषक स्पर्धेत श्रीलंकेने जगज्जेत इंग्लंडवर ८ विकेटने दणदणीत विजय मिळवला. या चौथ्या पराभवामुळे इंग्लंडला उपांत्य फेरी गाठण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे.

या उलट श्रीलंकेने या विजयाने सातव्या स्थानावरुन पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या ही अडचणी वाढल्या आहेत. या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेला विजयासाठी १५७ धावांचे लक्ष्य दिले आहे. या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी आतापर्यंत ४-४ सामने खेळले असून त्यापैकी केवळ १-१ सामने जिंकता आले आहेत. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने सर्वाधिक ४३ धावा केल्या. तब्बल सहा फलंदाज एकेरी धावसंख्येवर बाद झाले. इंग्लंडला झटपट पाच धक्के दमदार सुरुवात करताना २७ वर्षांचा इतिहास कायम ठेवण्यासाठी दमदार सुरुवात केली आहे. १९९६ पासून इंग्लंडला श्रीलंकेचा पराभव करता आलेला नाही.

# कुर्डुवाडीत पतीकडून पत्नीचा गळा दाबून खून

### मृतदेह घराबाहेरच पुरला; दुर्गंधी पसरल्याने खून उघडकीस

**कुर्डुवाडी** : अज्ञात कारणावरून नवऱ्याने बायकोचा गळा दाबून खून केला. नंतर पत्र्याच्या घरा शेजारीच प्रेत पुरले. दुर्गंधी पसरत असल्याने खुनाचा प्रकार उघडकीस आला. ही घटना बुधवार, दि. २५ रोजी सायंकाळी देवकते वस्ती, करमाळा रोड, कुर्डुवाडीत घडल्याचे उघडकीस आले.

खून करून मृतदेह दोन दिवस घरात ठेवला होता. नंतर घराबाहेर पुरला होता. दरम्यान, खुनाचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणी संशयित उमेश दगडू देवकते यास कुर्डुवाडी पोलिसांनी अटक केली. याबाबत कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात मयत मुलींची आई इंदूमती पाळेकर (रा.दौंड) यांनी कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ज्योती उमेश देवकते (वय-३८) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.

कुर्डुवाडी-करमाळा रोड, देवकते वस्तीत एका पत्र्याच्या शेडजवळ याठिकाणी काहीतरी पुरले असून, परिसरात दुर्गंधी पसरली असल्याची माहिती कुर्डुवाडी पोलिसांना बुधवारी सायंकाळी मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली असता पत्र्याच्या शेडला कुलूप होते.



घटनास्थळावरील पत्र्याच्या शेडशेजारी काहीतरी पुरून माती टाकून केलेला ढिगारा पाहून काहीतरी घातपात घडला असल्याची शंका पोलिसांना आल्याने पोलिसांनी सदर जागेच्या मालकाचा शोध घेतला असता आरोपी रात्री उशीरा परंडा रोडवर मिळून आला.त्याला पोलिसांनी सदर घटनेबाबत विचारले असता त्याने घटनेची माहिती पोलिसांना दिली.

पोलिसांनी त्या घटनास्थळावर बुधवारी रात्रभर व गुरूवार, दि.२६ रोजी सायंकाळपर्यंत पोलीस पहारा ठेवला. दुपारी ४.३० वा सुमारास नायब तहसीलदार पांडुरंग भडकवाड, पंचायत समितीचे दोन पंच यांच्या समक्ष आरोपीला घटनास्थळी आणून हा खून आरोपीने कशा पद्धतीने केला. याबाबत इनकॅमेरा आरोपीकडून माहिती जाणून घेतली. पत्र्याच्या शेडशेजारी पुरलेला मृतदेह बाहेर काढला.

यावेळी परिसरात अर्धा एक किलोमीटरपर्यंत दुर्गंधी पसरली होती. मृतदेह बाहेर काढल्यानंतर जागेवर पंचनामा केला. ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकिय अधीक्षक सुनंदा रणदिवे यांनी जागेवरच शवविच्छेदन करुन मृतदेह मृताच्या आई वडिलांच्या ताब्यात दिले. ही घटना सुमारे सहा ते सात दिवसांपूर्वी घडली असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

# ग्रीन सिग्नल, रेड कार्पेट फायनल

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्याची फलनिष्पत्ती समोर आली आहे. महायुतीच्या राज्य मंत्रीमंडळाच्या विस्ताराला दिल्लीश्वरांनी ग्रीन सिग्नल दिल्याचे सांगणयात येते. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांसाठी कॅबिनेटचे रेड कार्पे ट टाकण्याची लगबग सुरू झाली आहे. हिवाळी अधिवेनापूर्वी राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार करण्यात येईल, असे सांगण्यात येते. मंत्रीपदाबरोबरच राज्यमंत्रीपदाचा दर्जा असलेल्या महामंडळाच्या अध्यक्षपदांचेही वाटप होणार आहे.त्यामुळे महायुतीच्या आमदारांची, गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या काही नेत्यांची दिवाळी गोड होण्याचे संकेत आहेत.**




### विस्ताराचे भिजत घोंगडं

गेल्या वर्षभरापासून मंत्रिमंडळ विस्ताराचे भिजतं घोंगडं असल्याचे चित्र होते. पण अजित पवारांनी सत्तेत सहभाग घेतला आणि वर्षभरापासून रखडलेल्या मंत्रिमंडळ विस्ताराचा दुसरा टप्पा मार्गी लागला. पण या दुसऱ्या टप्प्याच्या विस्तारामध्ये शिंदे गटातील अनेक आमदार घोड्यावर बसून होते. पण ती मंत्रीपदे अजित पवारांनी खेचून घेतली. त्यामुळे शिवसेनेतून नाराजीचे सूर उमटू लागले. त्यामुळे आता तिसऱ्या टप्प्यातील विस्तार झाल्यास एकनाथ शिंदे गटातील कोणत्या आमदारांची वर्णी लागणार याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

राज्य मंत्रीमंडळाचा शेवटचा विस्तार रखडला आहे.त्यामुळे मंत्रीपद तसेच महामंडळाचे अध्यक्षपद मिळवण्यासाठी महायुतीमधील आमदारांनी व नेत्यांनी फिल्डिंग लावून ठेवली आहे पण विस्ताराला मुहूर्त सापडत नसल्याने त्यांच्यात नाराजी व्यक्त केली जात आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर या नाराजीचा फटका बसेल म्हणून शिंदे व फडणवीस यांनी तातडीने दिल्ली गाठली व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राजनाथ सिंह यांची भेट घेतली. मंत्रीमंडळ विस्तारासह मराठा आरक्षण यासह अन्य विविध विषयावर शिंदे- फडणवीस यांनी श्रेष्ठींशी चर्चा केल्याचे सांगण्यात येते. या चर्चेदरम्यान राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारावर देखील चर्चा करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर तब्बल १३ दिवसांनी खातेवाटप करण्यात आलं. त्यामुळे यावेळी देखील जरी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला तरी मंत्र्यांना खातं मिळण्यासाठी पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. दुसऱ्या टप्प्यात उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे अर्थखातं देण्यात आलं आणि पुन्हा शिवसेनेच्या आमदारांमध्ये नाराजीचे सूर उमटू लागले. तर यावेळच्या विस्तारामध्ये अजित पवार गटाकडून गृहनिर्माण खात्याची मागणी होऊ शकते. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेच्या आमदारांकडून नाराजी व्यक्त केली जाणार का हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. कुणाच्याही ध्यानीमनी नसताना अजित पवार सत्तेत आले काय आणि त्यांनी अर्थ, सहकार आणि इतर मलईदार खाती घेतली काय... पाहता पाहता हे सगळं घडलं. पण यामुळे शिवसेनेत बंड करून वर्षभरापूर्वी सत्ता स्थापन केलेल्या शिंदे गटात मात्र चांगलीच अस्वस्थता असल्याचे दिसून आले. एक तर मंत्रिपदासाठी आमदारांना रोज वाट पाहावी लागतेय, त्यातच नंतर आलेल्या अजित पवार गटाने इतक्या जलदगतीने नऊ महत्त्वाची कॅबिनेट खाती पारड्यात पाडून घेतली. यावरून सत्तेतील प्रमुख पक्ष असलेला भाजप हा शिंदे गटापेक्षा अजित पवारांवर जास्त मेहेरबान असल्याचे दिसून येतेय का? अशी चर्चा सुरू आहे.



### झटक्यात मलईदार पदे

अजित पवार सत्तेत आल्यानंतर आधीच वैतागलेल्या शिंदे गटाला आता हा नवीनच धक्का आहे. म्हणजे महाविकास आघाडी सरकार सुरळीत सुरू असताना ते भाजपकडे आले. पण त्यांना मंत्रिपदासाठी झुलवत ठेवण्यात आले. नंतर आलेल्या अजित पवार गटाला मात्र एका दमात नऊ मलईदार मंत्रिपदे देण्यात आली. त्यांनी मागितलेली खाती त्यांना देण्यात आली. राज्याची आर्थिक नाडी असलेल्या अर्थखात्याचा कारभार देण्यात आला. मात्र काहीही द्या... काहीतरी द्याच असा पवित्रा घेतलेल्या शिंदे गटाच्या आमदारांना झुलवत ठेवले जातेय.

मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यास राज्याचा तिसरा टप्प्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार हा पूर्ण होईल. या विस्तारामध्ये भाजपला ७, शिवसेनेला ५ आणि राष्ट्रवादीला तीन मंत्रीपदे मिळण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. महायुतीच्या सरकारचे अद्याप महामंडळाचे वाटप बाकी आहे. म्हणून या विस्तारामध्ये अजूनही महामंडळाचे वाटप होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच पेटलाय. तर गावोगावी पुढाऱ्यांना आणि स्थानिक प्रतिनिधींना येण्यास बंदी देखील घालण्यात आलीये. दरम्यान याच मुद्द्यावरुन मंत्रिमंडळाचा विस्तार देखील रखडला असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे हा मुद्दा लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आदेश वरिष्ठांकडून या बैठकीत राज्य सरकारला देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### काही करा, मंत्रीपद द्या

शिवसेना-भाजपने सत्ता स्थापन केल्यानंतर सेनेचा मुख्यमंत्री झाला पण नऊ मंत्र्यांनी म्हणावी तशी खाती देण्यात आली नव्हती. यावरून भाजपने फक्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच खूष करून बाकीच्यांची बोळवण केल्याचीही चर्चा होती. त्यानंतर गेल्या वर्षभरापासून सेनेच्या उर्वरित इच्छुकांना रोज मंत्रिपदाची शपथ घेतानाची स्वप्ने पडतात. भरत गोगावले, संजय शिरसाठ, संजय बांगर, बच्चू कडू असे कितीतरी आमदार हे आपण उद्याच मंत्री होणार असे रोज माध्यमांना ठासून सांगत होते. पण त्यांचा उद्या काही उजाडत नव्हता. इच्छुकांना रोज मंत्रिपदाची शपथ घेतानाची स्वप्ने पडतात. कोणतीही मंत्रीपदे द्या... खरे एकदाचे मंत्री करा असा पवित्राच इच्छुक आमदारांनी घेतल्याचे चित्र होते.

## सोलापूर-पुणे महामार्गावर बसचा अपघात; तीन जणांचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

सोलापूर-पुणे हायवेवर पाटस हद्दीत खासगी आराम बस उभ्या असलेल्या ट्रकवर आदळल्याने तीन ठार, तीस प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास घडली.

याबाबत यवत पोलीस ठाण्यातील सहायक फौजदार भानुदास छबुराव बंडगर (वय- ५१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजकुमार धर्मवीर दहिया (रा.काळेवाडी, पिंपरी चिंचवड) व ट्रक चालक संतोष इरप्पा नाईक (शेगाव, ता.जत, जि.सांगली) या दोघांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या अपघातात श्वेता प्रभू पंचाक्षरी (वय-३३), सत्यभामा शेषराव बोयने (वय ७२, दोघी औराद शहाजनी, निलंगा) तर सोलापुरातील पादत्राणे व्यावसायिक बाळासाहेब जालिंदर शेरखाने (वय-४२, जोडभावी पेठ) अशी मृतांची नावे आहेत. जखमी जोडीदार संतोष बनसोडे (वय-४०, सोलापूर) यांच्यासह तीस प्रवासी जखमी झाले आहेत.



गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास कुरकूंभ घाटात पुणे-सोलापूर हायवे रस्त्यावर पाटस (ता.दौंड) हद्दीत औराद येथून पुण्याकडे लोट्स टुर्स अँन्ड ट्रॅव्हल्सची बस ( एम.एच. ०९-सी.व्ही. ४५९७) जात होती.

दरम्यान, समोर रस्त्याच्या बाजुला थांबलेल्या (MH$-१२ UM² २८५४) ला पाठीमागून जोरात धडक दिली. या अपघातात बसमधील तीस प्रवासी व लहान मुले जखमी झाले. बस चालक व ट्रक चालक यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बस चालक ताब्यात : हेमंत शेडगे**

अपघाताची माहिती मिळताच यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे,पाटस पोलीस चौकीचे उपनिरीक्षक संजय नागरगोजे,महामार्ग पोलीस उपनिरीक्षक महेश कोंडुभैरे,श्रीहरी पानसरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.त्यानंतर तेथील विस्कटलेली वाहतूक सुरळीत करण्यात आली. त्यानंतर बस चालक याला ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले.

## खंडग्रास चंद्रग्रहण : 'श्रीं'च्या दर्शनवेळेत बदल

**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांची माहिती**

सुराज्य/पंढरपूर

आश्विन शुध्द १५, शनिवार दि.२८ ऑक्टोबर, रोजी खंडग्रास चंद्रग्रहण आपल्या देशात दिसणार असल्याने श्रीविठ्ठलाच्या नित्योपचारामध्ये व दर्शनाच्या वेळेत दि.२९ ऑक्टोबर रोजी बदल होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांनी दिली आहे.

त्यामध्ये ग्रहणाचे वेध दि.२८ ऑक्टोबर रोजी रोजी दु.०३.१४ पासून दि.२९ ऑक्टोबर रोजी रोजी प.२.२३ पर्यंत राहील. ग्रहण स्पर्श रात्री ०१.०५, मध्य रात्रौ ०१.४४ व मोक्ष रात्रौ ०२.२३ वाजता आहे. त्यामुळे ग्रहण स्पर्श (रात्रौ.०१.०५ मि.) झाल्यानंतर व ग्रहण मोक्ष (रात्रौ ०२.२३ मि.) झाल्यानंतर श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस, सर्व परिवार देवतांना चंद्रभागा (भीमा) नदीचे पाणी आणून स्नान घालण्यात येणार आहे.



तसेच दि.२८ ऑक्टोबर रोजी रात्रौ ११.०० ऐवजी १.०० पर्यंत दर्शन सुरू राहील व तदनंतर शेजारती रात्रौ १२.०० ऐवजी पहाटे ३.००, काकडा आरती पहाटे ४.०० ऐवजी ५.०० वा., व दर्शन सकाळी ६.०० ऐवजी ७.०० वाजता सुरू होणार आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




निर्णय सुपरफास्ट घ्यावा लागेल !


कल्याण
160-73-779

मुंबई
247-35-159


# तुळजाभवानीच्या चरणी पावणेचार कोटींचे दान

### सोन्यासह चांदीचे मोठ्या प्रमाणात अर्पण

सुराज्य/धाराशिव

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या तिजोरीत नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत पावणेचार कोटी रुपयांची देणगी जमा झाली आहे. देणगी दर्शन, दानपेटीत अर्पण केलेली रोख रक्कम आणि इतर धार्मिक विधींच्या माध्यमातून ही रक्कम तुळजाभवानी मंदिर संस्थानला प्राप्त झाली आहे. याच कालावधीत भाविकांनी सोने आणि चांदी मोठ्या प्रमाणात देवीचरणी अर्पण केली आहे.**

श्री क्षेत्र तुळजापूर (जि. धाराशिव) येथे नवरात्र काळात म्हणजे १५ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर दरम्यान तीन लाख ७३ हजार २४७ भाविकांनी तुळजाभवानी मंदिर समितीकडे अधिकृतपणे पैसे जमा करून देणगी दर्शन घेतले. त्यातून तुळजाभवानी मंदिर संस्थानला एक कोटी ९३ लाख ६६ हजार ४६२ रुपये प्राप्त झाले. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी दानपेटीमध्ये दीड कोटींहून



अधिक रुपयांची रोकड अर्पण केली. मागील नऊ दिवसांच्या कालावधीत तुळजाभवानी मंदिरातील दानपेटीमध्ये एक कोटी ५७ लाख ४२ हजार ७३० रुपये जमा झाले असल्याची अधिकृत नोंद आहे.विविध धार्मिक विधीपोटी मंदिर प्रशासन कार्यालयात पावती फाडून रोख रक्कम जमा करणार्या भाविकांची संख्याही मोठी आहे. नऊ दिवसांत २२ लाख ३९ हजार ५७७ रुपये इतका महसूल तुळजाभवानी मंदिर समितीला प्राप्त झाला. देणगी दर्शन, दानपेटी आणि इतर माध्यमातून मिळालेली ही सर्व रक्कम तीन कोटी ७३ लाख ४८ हजार ७६९ एवढी आहे.

भाविकांनी देवीचरणी वेगवेगळ्या मौल्यवान दागदागिने नवरात्रोत्सवात अर्पण केले. तुळजाभवानी मातेच्या चरणी ७३६ ग्रॅम सोने आणि ११ किलो ९५४ ग्रॅम चांदी अर्पण करण्यात आली असल्याची माहिती प्रशासकीय अधिकारी सिध्देश्वर शिंदे यांनी दिली.

## कामती येथे महिला सरपंचासह मुलास मारहाण; चौघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद शाळेतील कंपाउडचे काम करीत असताना ते तुमचे काम नाही, असे म्हणून महिला सरपंच व त्यांच्या मुलास दगड आणि हाताने मारहाण करून जखमी करण्यात आले.

ही घटना कामती (ता.मोहोळ) येथील लमाण तांडयाजवळ बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात कामतीच्या पोलिसांनी ग्रामपंचायत सदस्य आत्माराम पांडुरंग राठोड, त्याचे दोन भाऊ दिलीप राठोड, संजय राठोड आणि मुलगा सुरज आत्माराम राठोड (सर्व रा.कामती लमाण तांडा) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात महिला सरपंच मनीषा शंकर पवार (रा.कामती लामाण तांडा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या काल सकाळी अकरा वाजेच्या सुमारास गावातील लामाण तांड्याजवळच्या जि. परिषद शाळेतील तार कंपाऊंडचे काम करून घेत होत्या. त्यावेळी वरील चौघांनी घटनास्थळी येऊन त्यांना तुम्ही हे काम करायचे नाही.

तुम्हाला बघून घेतो अशी धमकी देत त्यांना आणि त्यांचा मुलगा अभिजीत पवार या दोघांना मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.